## सराव प्रश्नपत्रिका – १ इयत्ता दहावी विषय – भूगोल

**वेळ – दोन तास** **एकूण गुण – ४०**

**सूचना –**

१) सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

२) प्रश्नांची उत्तरे देताना आवश्यक तेथे आकृत्या/आलेख काढावेत.

३) प्रश्नांची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनाने लिहावीत.

४) शिसपेन्सिल वापरण्यास हरकत नाही. इतर रंग मात्र वापरू नयेत.

**प्र. १ अचूक पर्याय निवडा व विधाने पुन्हा लिहा.** ४

१) जगाच्या आर्थिक विकासाला हातभार लावणारा देश व भविष्यातील एक प्रमुख बाजारपेठ या दृष्टीने ............... या देशाकडे पाहिले जाते.

अ) भारत ब) ब्राझील

क) श्रीलंका ड) जपान

२) हिमालयाची सर्वांत दक्षिणेकडील रांग ............... ही आहे.

अ) लघु हिमालय ब) हिमाद्री

क) कुमांऊ ड) शिवालिक

३) भारतात ५०० मिमी पेक्षा कमी पर्जन्याच्या प्रदेशात ............... वने आढळतात.

अ) काटेरी व झुडपी ब) सदाहरित

क) पानझडी ड) निमसदाहरित

४) ब्राझीलचा ............... विस्तार जास्त असल्यामुळे हवामानात विविधता आढळते.

अ) विषुववृत्तीय ब) अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय

क) रेखावृत्तीय ड) अक्षवृत्तीय

**प्र. २ योग्य क्रम लावून साखळी पूर्ण करून लिहा.** ४

१) भारतातील प्राकृतिक भूरुपे उत्तरेकडून दक्षिणेकडे

दख्खनचे पठार – विंध्यपर्वत – हिमालय पर्वत – उत्तरेकडील मैदान – सातपुडा पर्वत

२) ब्राझीलमधील प्राकृतिक भूरूपे वायव्येकडून आग्नेयेकडून

ब्राझील उच्चभूमी – अजस्त्रकडा – गियाना उच्चभूमी – ॲमेझॉन नदी खोरे

३) लोकसंख्या वितरण चढत्या क्रमाने राज्यांची नावे लिहा.

आंध्रप्रदेश – उत्तरप्रदेश – हिमाचल प्रदेश – मध्यप्रदेश

४) ब्राझीलमधील पावसाचे प्रमाण उतरत्या क्रमाने लिहा.

पर्नाब्युको – रिओ ग्रांडे दो सुल – ॲमेझोनास – रोराईमा

**प्र. ३ चूक की बरोबर सांगा व चुकीची विधाने दुरुस्त करा. (कोणतेही चार)** **४**

१) क्षेत्रभेटीदरम्यान पर्जन्यमानातील फरक वनस्पतीवरून लक्षात येत नाही.

२) ब्राझील हा देश सुमारे दीड शतक पोर्तुगीजांच्या आधिपत्याखाली होता.

३) अरवली पर्वताच्या पश्चिमेकडील भाग गंगा नदीच्या खोऱ्यातील मैदानी प्रदेश आहे.

४) भारतात उत्तरेकडून दक्षिणेकडे जाताना तापमान वाढत जाते.

५) कटिंगाच्या दलदलीच्या प्रदेशात महाकाय ॲनाकोंडा आढळतात.

**प्र. ४ (अ) नकाशा आराखाड्यात माहिती भरा व सूची तयार करा.(कोणतेही चार)** **४**

i) अवर्षण चतुष्कोण

ii) प्रतिरोध पर्जन्याचा प्रदेश

iii) सव्हाना

iv) कटिंगा (काटेरी झुडपे)

v) जास्त लोकसंख्या घनतेचा प्रदेश

vi) दक्षिणेकडील मध्यम लोकसंख्या घनतेचा प्रदेश

प्र. ४ (आ) खाली दिलेल्या नकाशाचे वाचन करा व दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.
(कोणतेही चार) ४




i) ईशान्य भारतातील लोकसंख्येची घनता कमी असलेले राज्य कोणते?

ii) केरळ राज्याच्या लोकसंख्येची घनता किती आहे?

iii) गंगेच्या खोऱ्यातील जास्त लोकसंख्या घनतेची कोणतीही दोन राज्ये सांगा.

iv) भारताच्या उत्तरेकडील कमी लोकसंख्या घनतेचे राज्य सांगा.

v) पूर्व किनारपट्टीवरील जास्त लोकसंख्या घनतेचे एक राज्य सांगा.

vi) वायव्येकडील मध्यम लोकसंख्या घनतेचे राज्य सांगा.

**प्र.५ भौगोलिक कारणे लिहा. (कोणतेही दोन)** **६**

१) क्षेत्रभेटीदरम्यान कचऱ्याचे व्यवस्थापन करणे गरजेचे असते.

२) सावो पावलो येथे मानवी वस्ती केंद्रित झालेली आढळते.

३) भारतात पानझडी वने आढळतात.

४) भारतात लोहमार्गाने वाहतूक मोठ्या प्रमाणात केली जाते.

**प्र.६ (अ) खाली दिलेल्या माहितीच्या आधारे जोडस्तंभालेख तयार करा आणि प्रश्नांची उत्तरे लिहा.** **६**

भारत व ब्राझीलचे सरासरी आयुर्मान (वर्षे)

| | देश/वर्ष | १९९० | २००० | २०१० | २०१६ |
|---|---|---|---|---|---|
| सरासरी आयुर्मान | भारत | ५८ | ६३ | ६७ | ६८ |
| | ब्राझील | ६५ | ७० | ७३ | ७५ |

i) २०१० साली भारताचे सरासरी आयुर्मान किती वर्षे आहे?

ii) दोन्ही देशांमधील सरासरी आयुर्मानातील वाढ कोणत्या दशकात समान आहे?

iii) दोन्ही देशांच्या सरासरी आयुर्मानाबाबत आलेखाच्या वाचनानंतर काय निष्कर्ष काढाल?

**किंवा**

**प्र.६ (आ) खालील आलेखाचे वाचन करा आणि प्रश्नांची उत्तरे लिहा.** **६**

भारत व ब्राझील पर्जन्यमान आणि तापमान



i) भारताचे कमाल व किमान तापमान सांगा.

ii) भारत व ब्राझील पर्जन्याच्या काळामध्ये तुम्हांला कोणता फरक आढळतो?

iii) ब्राझील मध्ये कोणत्या महिन्यात कमी पर्जन्यमान होते?

iv) भारतामध्ये कोणत्या महिन्यात जास्त पर्जन्यमान होते?

v) भारतामध्ये कोणत्या महिन्यात कमी पर्जन्यमान होते?

vi) ब्राझीलमध्ये कोणत्या महिन्यात जास्त तापमान आहे?

**प्र.७ सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** ८

१) क्षेत्रभेटीमुळे कोणत्या भौगोलिक ज्ञानात वाढ होते ते सोदाहरण स्पष्ट करा.

२) ब्राझीलच्या तापमानात ऋतुनुसार विविधता आढळते, स्पष्ट करा.

३) भारतात लोकसंख्या वाढीचा दर कमी होत आहे, तरी लोकसंख्या वाढत आहे, स्पष्ट करा.

४) भारतीय वन्य प्राण्यांचे संरक्षण व वनसंवर्धनासाठी उपाययोजना सांगा.